शंकरही आज्ञा घेऊन स्वस्थानीं गेला व श्रीकृष्ण वधुवरें घेऊन द्वारकेंत आला.

अध्याय २९ वा.

सुदामचरित्र.

कालयवनाच्या राज्यांत गंगेच्या तीरीं कपिला नांवाच्या नगरींत सुदामदेव नांवाचा एक अत्यंत दरिद्री ब्राह्मण राहात असे; त्याच्या घरीं मुठभर कण संग्रहास नव्हते. तो कोरान्न मागून आपल्या बायकोमुलांचा निर्वाह चालवित असे. त्याची स्त्री पतिव्रता असून उभयतां एकचित्तानें वागत असत. पुढें कांहीं दिवसांनीं दुष्काळ पडून लोक देशधडीस लागले. त्यामुळें भिक्षेचेंही साधन कांहीं चालेनासें झालें. तेव्हां झोंपडी सोडून एकाच्या आंगण्यांत स्त्रीपुत्रांसह राहिला. भिक्षा कोठें मिळेना त्यामुळें लेंकरें कृश होऊन, स्त्रियेचे प्राण डोळ्यांत उरले. ती ह्मणूं लागली–जर माझें माहेर असतें तर लेंकरें तिकडे पाठवून दिलीं असतीं.

मग ती पतीस ह्मणाली–तुमचा बाळपणींचा मित्र श्रीकृष्ण द्वारकेंत नांदत आहे, त्याच्याकडे गेल्यास तुमचें दरिद्र दूर करील. शिवाय तुह्मीं एका गुरुजवळ विद्याभ्यास केला आहे

सवर्व गुरुबंधूचें नातें आहे. सुदामा ह्मणाला—प्रिये ! तूं ह्मणतेस तें खरें; परंतु राजा, गुरु, देव व वैद्य यांच्या भेटीस रिकाम्या हातानें जाऊं नये. जर कृष्णभेटीस जाण्याचें ह्मटलें तर भेट काय न्यावी ? मग तिनें शेजारणींकडून मुठभर पोहे उसने मागून आणिले व ते फाटलेल्या चिंध्यांत ठायीं ठायीं गांठी देऊन बांधून, दोन हात नेसण्यास व एक हात अंगावर अशीं जीर्ण वस्त्रें देऊन द्वारकेंत जाण्यास सांगितलें. तेव्हां स्त्रियेचें समाधान करून तो मार्गास लागला.

सुदामा मार्ग चालत असतां, विचार करूं लागला कीं, कृष्णभेटीस मज दीनाचा शिरकाव कसा होईल ? कृष्णाच्या स्त्रिया माझा विनोद करतील. असें मनांत आणून पोह्यांचें गांठोडें घडी घडी पाहात जात असतां, द्वारका दृष्टीस पडली. तें विरंचीनिर्मित चोविस योजनें विस्तीर्ण नगर सुदाम्यानें पाहतांच त्यास आनंद झाला व कृष्णसभेच्या दारांत गेला. त्यास द्वारपाळ तूं कोण ह्मणून विचारूं लागले. तेव्हां मीं कृष्णाचा बंधु असें सांगतांच, सर्व लोक हांसूं लागले. नंतर हरीच्या द्वारीं कोणासही आडकाठी नसल्यामुळें तो ब्राह्मण श्रीकृष्ण बसला होता तेथें गेला. त्यास पाहतांच श्रीहरीनें आसन सोडून धांवत जाऊन चरण धरून, आलिंगन दिलें आणि आपल्या आसनावर बसविलें व षोडशोपचारें पूजा केली.

नंतर सभा विसर्जन करुन, सुदामास हातीं धरुन, श्रीकृष्ण रुक्मिणीच्या मंदिरांत गेला, व दोघे रत्नखचित डोल्हाऱ्यावर बसले. मग श्रीहरीनें रुक्मिणीस बोलाविण्यास दासी पाठविली. तिला रुक्मिणीनें विचारिलें, त्यांचे जवळ दुसरें कोण आहे ? दासी ह्मणाली–एक दरिद्री ब्राह्मण चिंध्यांचे भार पांघरलेला आला आहे. त्यास जगज्जीवनानें भेटून डोल्हाऱ्यावर बसविला आहे. असें ऐकून रुक्मिणीनें हरीजवळ येऊन, उभयतांस नमन केलें. तेव्हां कृष्ण ह्मणाला–जसा आपला बंधु बलिभद्र तसाच हा गुरुबंधु सुदामदेव होय. रुक्मिण बोलली–जसा गोरक्षक तसें याचें मुख दिसतें. हा आपला बाळपणींचा बंधु असेल; आजपर्यंत हें रत्न कोठें झांकून ठेविलें होतें ? हरि ह्मणाला–याचें आपल्या हातानें पूजन कर. मग रुक्मिणीनें त्याचे चरण धुतले. नंतर न्हावी आणवून श्मश्रु करवून उत्तम पडदणी नेसावयास दिली व चिंध्या रुक्मिणीजवळ ठेवण्यास दिल्या.

त्यानंतर अष्टनायिकांनीं सुदाम्यास सुवर्णपाटावर बसवून अनेक सुगंधी तेलें लावून, स्वहस्तांनीं अंग मर्दन करून मंगल स्नान घातल्यावर श्रीहरीनें विचारिलें कीं, वहिनीनें मला कांहीं भेट दिली कीं नाहीं ? तेव्हां त्यानें पोह्याचें फडकें दाखविलें. तें कृष्णानें आणून त्यांतील पोहे घेऊन खाणार तोंच रुक्मिणीनें सांगितल्यावरुन थोडथोडे सर्वांस देऊन आपणही भक्षण केले.

पुढें संध्यादि कर्में आटोपल्यावर मिष्टान्नभोजन दिलें. त्यावेळीं सत्यभामेनें मोठा पितांबर नेसावयास दिला, रुक्मिणीनें तांबूल करून दिला. नंतर कृष्ण व सुदामा पलंगावर बोलत बसले. कित्येक कृष्णस्त्रिया सुदाम्याचें पादसंवाहन करित होत्या. अशा प्रकारें वडील बंधुपेक्षां अधिक सुदाम्यास मान मिळाला. तो एक महिना कृष्णाकडे राहिला. एखादे वेळीं त्याच्या मनांत येई कीं, मला कृष्णानें कांहीं न देतां, आतां अंगावर दागिने आहेत तेवढेच जरी मजजवळ ठेविले तरी हजारों जन्मांचें माझें दरिद्र दूर होईल.

श्रीकृष्ण रुक्मिणीस ह्मणाला—सुदाम्याचें कुटुंब अन्नाशिवाय उपाशीं मरत आहे. असें बोलून विश्वकर्म्यास आज्ञा दिली कीं, जशी द्वारकापुरी आहे, तशीच सुदाम नगरींत सर्व संपदा भरून रात्रींत परत ये. अशी आज्ञा होतांच, विश्वकर्म्यानें सुदाम नगरी द्वारकेसारखी रचिली. असो. एक महिनापर्यंत सुदाम्यास घरोघर पाहुणेर मिळत असतां, त्याला कुटुंबाची चिंता पडून, कृष्णास ह्मणाला—आतां मला जाण्यास आज्ञा द्यावी. कृष्ण ह्मणाला—खुशाल जा. परंतु हे वस्त्रालंकार येथेंच ठेवावे. असें सांगून चिंध्यांचें गांठोडें पुढें ठेविलें. मग सुदाम्यानें नूतन वस्त्रें काढून आपलीं पूर्वींचीं वस्त्रें परिधान केलीं आणि ह्मणाला—कर्माची कहाणी दुर्धर होय.

नंतर कृष्णाची आज्ञा घेऊन मार्गे चालत असतां, एक महिना झाला, कुटुंबघात झाला असेल असें बोलूं लागला. मग नगराजवळ येतांच, अवर्णनीय शोभा पाहून द्वारका जवळ आली कीं काय ? असा भ्रमित झाला. इतक्यांत गांवांतले लोक आले, त्यांस या नगरीचें नांव काय ह्मणून विचारूं लागला. ते ह्मणाले–या गांवाचें नांव सुदामपुरी असें आहे. असें ऐकून हे माझा विनोद करितात असें मनांत ह्मणूं लागला. तों दळभार चतुरंग सैन्यासह प्रधान सामोरा आला. तेव्हां त्यास ह्मणाला–माझें कुटुंब काय झालें ? माझी झोंपडी कोणी मोडून टाकिली ? माझीं बाळें मेलीं कीं काय ? असें बोलत आहे तों प्रधान जवळ येतांच, ब्राह्मण दिव्य देह पावून राजा झाला. त्यास वस्त्रालंकार चढवून गजस्कंधीं बसवून मिरवित मंदिरांत आणिला. त्यानें आपल्या देवांगनेसारख्या स्त्रीस व मुलांस पाहून, श्रीकृष्ण पावला असें मनांत ह्मणाला. नंतर सुमुहूर्तावर राजास सिंहासनावर बसवून छत्र धरिलें. अशा प्रकारें सुदाम्याचे मुठभर पोहे भक्षून इंद्रपदातुल्य राज्य श्रीकृष्णानें अर्पण केलें.

अध्याय ३० वा.

कृष्णसत्यभामेचा विनोद व नारदास कृष्णदान.

एके दिवशीं श्रीहरी रात्रीं मित्रविंदेच्या घरीं जाण्याचा चुकून, सत्यभामेच्या येथें आला व ती दारांत उभी असलेली पाहून मुद्दाम, मित्रविंदे ! सुखी आहेसना ? ह्मणून विचारलें. असें ऐकतांच, सत्यभामेला सवतीचें नांव घेऊन हांक मारली ह्मणून क्रोध येऊन, ती कृष्णास ह्मणाली—यावें यावें कंसासुरा ! मथुरा सोडून द्वारकेस येणें कसें झालें ? वैऱ्याच्या नांवानें हांक मारतांच कृष्णासही राग येऊन तुला भ्रम कां पडला ह्मणून भामेस विचारलें. भामा बोलली—डोळे पुसून पहा बरें ? मित्रविंदा कोठें आहे ती दाखवा पाहूं ? असें बोलतांच कृष्णास हांसें आलें व सत्यभामेचा गर्व जाणून गुप्त झाला. तेव्हां सत्यभामा हरिप्राप्तीकरितां खेद करूं लागली. शेवटीं धांवा करितांच, भामा निजली असतां कृष्णानें दरवाज्यावर थाप मारिली. ती ऐकून कोण चोर दरवाजा ठोकतो ह्मणून बोलूं लागली. कृष्ण बोलला—मी माधव आलों आहें. तुझे डोळे निद्रेनें भ्रमले काय ? भामा बोलली—माधव ह्मणजे वसंत, त्यानें वनांत बसावें, तो येथें कशाला आला ? हरि ह्मणाला—मी चक्रधर आहें. ती ह्मणाली—तूं कुंभार रात्रीचा कशाला आलास ?

हरि बोलला–मी धरणीधर आहे. भामा बोलली–तूं फणीधर मवरल्या रात्रीं कोणास डंखावयास आलास ?

अशा प्रकारचा संवाद चालल्यावर भामेनें दरवाजा उघडून निंबलोण करून, चरणावर मस्तक ठेविलें आणि बोललेल्या शब्दाची क्षमा करावी असें ह्मटलें. नंतर एकांत सुखशयनीं सत्यभामेनें चक्रपाणी भोगिला. पुढें एके दिवशीं नारद सत्यभामेच्या मंदिरांत आला. त्याची तिनें पूजा केल्यावर विचारलें कीं, जन्मोजन्मीं श्रीकृष्ण भ्रतार होण्याकरितां कोणतें व्रतदान करावें ? असें ऐकून नारदानें तिचा गर्व झाडण्याकरितां कृष्णाचें दान कर असें सांगितलें. मग सत्यभामेनें एकांतीं हरीस विचारलें कीं, पुरुषोत्तमा ! मी तुमचें दान करितें. कृष्ण ह्मणाला–मग उशीर कां, तुझ्या मनास आलें तसें कर.

नंतर तिनें कृष्णदान घेतां काय ? ह्मणून ब्राह्मणांस विचारिलें. पण कोणी घेण्यास तयार होईना. मग नारदाजवळ येऊन ह्मणाली–कृष्णदान कोणी घेत नाहीं तरी तुह्मी अंगिकार करावा. नारद ह्मणाला–ठीक आहे, मी दान घेतों. नंतर कृष्णास ह्मणाली–मी तुह्मांस नारदास दान देतें हें तुमच्या विचारास मानवतें काय ? श्रीहरी बोलला–दे तर मग उशीर कां ? असें ऐकतांच, भामेनें संकल्प करून पुष्यार्क योगावर कृष्णदान केल्यावर नारद कृष्णास ह्मणाला–हा ब्रह्मविणा

सांभाळ. असें सांगून नारद कृष्णास घेऊन चालता झाला. मागें सत्यभामा वियोगानळानें अहाळून शोक करूं लागली. तों सत्यभामेच्या येथें सर्व कृष्णकामिनी जमा झाल्या. जांबुवंती ह्मणाली—आह्मीं इतक्या जणी असतां, कृष्णदान देण्यास तूंच धनीण झालीस काय ?

अशा प्रकारें सर्व स्त्रिया सत्यभामेस टोंचून बोलूं लागल्या. इतक्यांत देवकी तेथें येऊन तीही नाना प्रकारें बोलूं लागली. त्यावेळीं सत्यभामा अधोवदन होत्साती उगाच राहिली. नंतर बळराम, वसुदेव, उद्धव, अक्रूर, उग्रसेन आदिकरून, चतुरंग सैन्यासह नारदाच्या मागें चालले. तेव्हां श्रीकृष्ण नारदास ह्मणाला—आमचे वडील येत आहेत, आतां आपणांस शिक्षा करतील. नारद ह्मणाला—तूं भिऊं नको, मी सर्वांस उत्तर देतों. तोंच वसुदेव बलराम जवळ येऊन ह्मणाले—आमचें श्रीकृष्ण-जीवन सत्यभामेस वचनीं गोंवून नेतां काय ? नारद बोलला—मी ठकवून नेतों कीं काय ? मला सत्यभामेनें दान दिला तो तुह्मीं परत मागतां ? मी ह्मातारा ह्मणून हरीस सांगाती घेतला आहे. यादव पदर पसरून ह्मणाले—तुह्मीं मागाल ती वस्तु कृष्णा-बद्दल देतों. नारद बोलला—कोणती वस्तु तुमचेजवळ मागूं ? नाशिवंत देऊन अविनाशी नेतां ? असा सोबती त्रिभुवन शोध-ल्यानें मिळणार नाहीं. यादव ह्मणाले—स्यमंतक मणी घेऊन

श्रीकृष्णास सोडा. नारदानें सांगितलें, त्या मण्यामुळें पुष्कळ अनर्थ झाले आहेत, तो मला नको. मग कृष्णाच्या भारंभार सुवर्ण देण्यास यादव तयार होतांच, नारदानें कबूल केलें.

नंतर तुळा आणून श्रीहरीस एका पारड्यांत बसविला. त्यावेळीं सत्यभामा ह्मणाली—श्रीधरास मीच सोडवीन. मला बापानें दिलेल्या मण्यापासून नित्य नवभार सुवर्ण निघतें ! तें सर्व पारड्यांत घातलें तरी कृष्णाचें पारडें उचलेना. मग सोळा हजार स्त्रियांनीं आपल्या जवळील सुवर्ण, तसेंच द्वारकेचें राज्य भांडार सर्व तुळेंत घातलें. तें जसा समुद्रांत कण त्याप्रमाणें झालें. अष्टधातु घातल्या त्याही व्यर्थ गेल्या. नारद आणि गोविंद या दोघांनीं हा विनोद मांडून एक भोंदु व एक मैंद असे सत्यभामेस मिळाले. पारडें उचलत नाहीं असें पाहून देवकी धाय मोकलून सत्यभामेस वैरिणी ही तूं अघटित करणी केलीस असें बोलून, नारदाचे चरण धरून पुत्रदान मागूं लागली. मग नारद ह्मणाला—रुक्मिणीच्या येथें पुष्कळ सुवर्ण आहे तिला बोलावणें पाठवा.

नारदाचें वचन ऐकतांच, उद्धवानें जगन्मातेजवळ जाऊन, साष्टांग नमस्कार घालून, सर्व वृत्तांत निवेदन केला. तो ऐकतांच तशीच वृंदावनाजवळ जाऊन तुळसीस नमन करून तीन प्रदक्षिणा घालून, एक पिकलेलें पान तोडून,

तें रत्नताटांत घालून वर वस्त्र झांकिलें आणि श्रीकृष्ण नारद जेथें होते तेथें येऊन षोडशोपचारें पूजा करून भावार्थाचें तुलसीपत्र पारड्यांत ठेविलें. त्याबरोबर पारडें आपोआप उचललें. त्यावेळीं देवांनीं पुष्पवर्षाव केला, व सत्यभामा लज्जित झाली. असो. पारड्यांत घालण्याकरितां सोनें पुष्कळ जमलें होतें, त्यावर सर्वांची मिठी पडून, माझें माझें ह्मणून गोपिका भांडूं लागल्या. तें कौतुक रुक्मिणी, श्रीरंग व नारद पाहात होते. सत्यभामाही लोभानें मी पर्वतासमान सुवर्ण घातलें आहे, असें ह्मणत धांवत आली. इतक्यांत देवकी सर्व जणींस ह्मणाली–अगे तुह्मीं अवघ्या मूर्ख आहां, माझे अलंकार मजपुढें टाका. असें ऐकून गोपिका गदगदां हांसून बोलल्या–मामिसें ! तुह्मांस ह्मातारपणीं सोस सुटला ! आतां हे अलंकार मुनांस वांटून टाका. नंतर नारदानें भीमकीस प्रदक्षिणा घालून ऊर्ध्वपंथें गमन केलें. मग सर्वजन धनांत गुंततांच रुक्मिणी जगन्मोहनास घेऊन गेली.

अध्याय ३१ वा.

मारुतीची तीर्थयात्रा, गरुड यादवांचा गर्वहरण व मारुतीची भेट.

एकदां भूतभविष्यवर्तमान जाणणारा नारद मुनी तीर्थें करित

करित दक्षिण समुद्रीं रामेश्वरास आला. तेथें मारुती श्रीराम ध्यानाचें अनुष्ठान करित बसला होता. तो नारदास भेटला. ते दोघे बाळ ब्रह्मचारी श्रीहरीला लक्ष्मीहून फार आवडत असत. उभयतांचें क्षेमालिंगन झाल्यावर नारद मारुतीस ह्मणाला—तूं येथें काळ कसा क्रमितोस ? मारुती बोलला—श्रीरामचरित्र आठवून येथें वास करितों. नंतर पृथ्वीवर तीर्थें पुष्कळ आहेत तीं एकदां पाहून ये असें नारदानें मारुतीस सांगून, तेथून द्वारकेस गमन केलें. कृष्णानें त्याची पूजा करून वर्तमान विचारिलें.

तेव्हां नारद ह्मणाला—कृष्णा ! मी तीर्थें करित सेतुबंध रामेश्वरास आलों. तेथें श्रीरामभक्त महायोगी हनुमंत पाहिला. त्याचे गुण काय वर्णन करूं ? त्याच्या सारखा विरक्त ब्रह्मांडोदरांत नाहीं. असें ऐकतांच, श्रीहरीनें नारदाचे कंठास मिठी मारून ह्मटलें—तो योगी मी दृष्टीनें केव्हां पाहीन असें झालें आहे. नारद ह्मणाला—तो तुमच्या दर्शनास लौकरच येईल.

इकडे मारुती तीर्थें करित गोदातीर, ज्योतिर्लिंग, त्र्यंबक यावरून पंचवटीस येऊन ह्मणाला—येथें माझ्या स्वामीनें दंडकारण्य उद्धरिलें. पुढें पश्चिममार्गानें चालला तों अयोध्येसारखी द्वारका पाहिली. मग गोमती तिरीं येऊन स्नानसंध्या सारून रघुनाथाचें ध्यान केलें आणि सर्व ब्राह्मणांस नमन करून, विचारूं लागला कीं, या नगराचें नांव कोणतें व येथें राजा

कोण आहे ? मुनी ह्मणाले—या नगरास द्वारावती असें नांव असून, येथें राजा यदुपती पूर्ण अवतार आठवा नांदतो नदीचें नांव गोमती, पलिकडे चक्रतीर्थ, यांत प्राण्याच्या अस्थी पडल्या असतां, त्यांचीं चक्रें होतात. असो. ब्राह्मणांस नमन करून मारुती द्वारके भोंवतालच्या वनांत शिरून यथेच्छ फळें खाऊन, वनाचा विध्वंस करून, वनरक्षकांस चेष्टा दाखवूं लागला. तेव्हां रक्षक ह्मणाले—वानरा ! तूं वनाचा नाश केलास ? आतां तुला राजपुत्र मदन, सांब ताडण करतील.

मारुती ह्मणाला—येथें राजा कोण नांदतो ? ते ह्मणाले—येथें राम व श्रीपती असे दोघे पुरुषार्थी बंधु नांदतात. असें ऐकून मारुती ह्मणाला—एक दाशरथी श्रीराम सूर्यवंशीं अवतरला; त्या माझ्या रामाचा नामधारी या पृथ्वीवर कोण आहे; त्याचें नांव सांडा नाहींतर ही नगरी पालथी घालीन. वनरक्षक ह्मणाले—तो राम आह्मीं पूर्वी ऐकिला, त्याला दशरथानें बाहेर घातला, त्याच्या बरोबर मर्कटांचा मेळा असून, सीते सीते ह्मणून वृक्ष पाषाण आलिंगीत होता; आमचा बळकट बळीराम यदुवंशांत अवतरला आहे.

असें ऐकतांच, मारुतीस अनिवार क्रोध चढून, भीमरूपानें प्रगट होऊन, द्वारका समुद्रांत पालथी घालतों, असें बोलून पुच्छ धरणीवर आपटलें; त्याबरोबर वनकर भिऊन कृष्णास

सांगावयास गेले. तों श्रीकृष्ण देवाची पूजा करित होता. एकदां भक्तांनीं विचारलें, तुह्मीं एकांतीं कोणाचें ध्यान करतां ? तें देवतार्चन आह्मांस दाखवावें. मग देव्हारा उघडून दाखवितांच, प्रल्हाद, नारद, पराशर, व्यास, वाल्मिक, सनत्कुमार, अंबरिष, रुक्मांगद, हरिश्चंद्र, भीष्म, दाल्भ्य, शुक, शौनक, ध्रुव, धर्म, भीमार्जुनादिक, भरत, विदुर, गुहक, बळी, उपमन्यु, बिभीषण, उद्धव, अक्रूर, मारुती, सुग्रीव, जांबुवंत, अंगद इत्यादि सगुण भक्तांच्या मूर्ति भक्तांनीं पाहून हरीचे चरण धरिले. तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाला—मी भक्ताशिवाय कोणाचें ध्यान करूं ?

नंतर उद्धव अक्रूरासह श्रीकृष्ण सभेंत येत असतां श्रीहरी उद्धवास बोलला—आज माझें वक्षःस्थळ स्फुरण पावत असून, उत्तम शकून होत आहेत. यावरून कोणाची भेट होणार तें कळत नाहीं. मग श्रीहरी सिंहासनावर येऊन बसल्यावर, नारद तुंबराचें गायन चाललें होतें. इतक्यांत वनरक्षक येऊन सांगूं लागले कीं, वनांत एक वानर आला असून, त्यानें फळें खाऊन वनाचा नाश केला. आह्मांला येथें राजा कोण ह्मणून विचारतांच, राम, कृष्ण असें सांगितल्यावरून तो मळयरुद्रासारखा कोपून रामाचें नांव सांडा नाहींतर नगरी पालथी घालीन असें बोलूं लागला. असें ऐकतांच, जगन्निवासानें गरुडास सांगितलें कीं, त्या वानरास धरून आणावें.

हें कृष्णाचें वचन ऐकतांच, गरुडास गर्व होऊन ह्मणाला—मी पडत्या आकाशास धीर देणारा त्या मला यत्किंचित् वानर धरावयास पाठवितां, याचें आश्चर्य वाटतें. मग गरुड श्रीहरीस नमन करून, मारुती फळें झेलित बसला होता तेथें आला आणि ह्मणाला—अरे वानरा ! तुला आतां शिक्षा लावितों. मारुती बोलला—अरे ! तूं पुरुषार्थानें फार बडबडतोस तर तुझें नांव काय आणि तुला कोणी पाठविलें ? गरुड ह्मणाला—माझा पुरुषार्थ त्रिभुवन जाणत असून, मी कश्यपसुत श्रीरंगाचा दूत आहे. मीच अमृत नेलें. माझ्या भीतीनें शेष पृथ्वीखालीं दडाला आहे.

असें ऐकून हनुमंत ह्मणाला—जो आपल्या मुखानें आपला पुरुषार्थ वर्णितो तो शतमूर्खांहून मूर्ख होय. हें वचन ऐकतांच, गरुडानें मारुतीचा चवडा चंचूनें झडपण्यास अकस्मात् उडी घातली. पण मारुती किंचित्‌ही हालला नाहीं. एकक्षण गेल्यावर मारुतीनें गरुडास पायीं धरून द्वारकेहून साठ हजार योजनें दूर समुद्रांत भिरकाऊन दिला. तेव्हां अभिमानाचें फळ पावलों असें मनांत समजून, श्रीहरीचा धांवा करितांच, किंचित् सावध होऊन, दुसऱ्या मार्गानें महाद्वारांत येऊन पडला. त्याला उचलून सेवकांनीं हरिचरणावर घातला. तेव्हां श्रीकृष्णानें काय वृत्तांत झाला ह्मणून विचारितांच, बोबडी वळत ह्मणाला—पुरुषो-

त्या ! तुह्मांस जर क्रोध आला होता तर येथेंच मला शिक्षा कां केली नाहीं ? मला वानराच्या हातीं मारविलेंत ! श्रीकृष्ण ह्मणाला–तुझ्या बळेंकरून मी त्रिभुवनांत बळकट झालों; असें असतां उगाच संपादणी कारितोस ? तुझ्या योग्य हें काम नव्हतें, पण मी सहज पाठविला. तर आतां वानर जिवें मारलेंस किंवा पळवून लाविलास ? गरुड ह्मणाला–कंसारी ! अझून माझेवर कोप कां ? तो वानर केवळ कृतांत होय. त्यानें मला समुद्रांत भिरकावून दिलें, त्याशीं झुंजेल असा वीर त्रिभुवनांत दिसत नाहीं. श्रीहरी ह्मणाला–गरुडा ! तुझी अशी दशा झाली मग आह्मांस तो कसा आटोपेल ? नारद बोलला–नांव सांडल्या-शिवाय तो येथून जाणार नाहीं.

नंतर बलराम प्रद्युम्न ह्मणाले–आह्मांस आज्ञा करा, आह्मीं क्षणांत वानर धरून आणतों. त्यांचा गर्व श्रीकृष्णानें जाणून सांगितलें, सर्व दळभार घेऊन जा व त्यास धरून आणा. अशी आज्ञा होतांच, यादव समुद्रतीरास आले. तों मारुती रामचरित्र आठवून पाठमोरा बसला होता, तो यादवांस वांकुल्या दाखवूं लागला. त्यास यादव ह्मणाले–मर्कटा ! तूं रामाचें नांव सोडण्या-करितां चेष्टा मांडल्या आहेस, तुला आतां शिक्षा करूं. मारुती बोलला–अवघे जण एकदांच मरावयास कां आलेत ? तुह्मां लेकरांशीं युद्ध करावयास मला लाज वाटते.

असें बोलतांच, सर्वांनीं मारुतीवर बाणांचा पर्जन्य पाडिला, पण त्यास न मानून कौतुकानें पुच्छ सोडलें. तें सर्वांनीं धरून द्वारकेंत नेलें तोंच पुच्छ आळोआळीं धांवून ज्यांस गर्व झाला होता, त्यांचें बंधन करून, वर उचललें; त्यामुळें यादववीर लोंबूं लागले. तोंच मारुतीनें विक्राळ मुख पसरलें. तें पाहून सर्व भयभीत होत्साते, पुच्छाच्या मिठ्या सोडून, समुद्रांत उड्या घेऊं लागले. त्याबरोबर मारुतीनें पुच्छ समुद्रांत बुडविलें आणि भयंकर आरोळी दिली. मग ते सर्व कृष्णसभेस आले. कृष्ण नारदास ह्मणाला–आतां काय युक्ति करावी ? नारद बोलला–रामाचें नांव सांदा नाहींतर हा अनर्थ करील. नंतर बळरामानें विचारलें–नारदमुनी ! यास काय उपाय करावा ? नारद बोलला–मला कांहीं समजत नाहीं, तो चक्रपाणी जाणत आहे.

मग श्रीहरी ह्मणाला–त्याला रामरूप दाखविल्याशिवाय तो समजणार नाहीं. असें बोलून श्रीकृष्ण राम, बळिभद्र लक्ष्मण, पांचजन्य भरत, सुदर्शन शत्रुघ्न अशीं रूपें धरिलीं आणि नारदास सत्यभामेकडे पाठवून, सीता होण्यास सांगितलें. तिनें अनेक वेळां अनेक शृंगार केले परंतु सीतारूप तिला धरवलें नाहीं; त्यामुळें तिचा गर्वभंग होऊन प्राणत्याग करावा असें वाटलें. नंतर श्रीहरीनें सत्यभामेस सांगितलें कीं, तूं व सोळा

सहस्र गोपी रुक्मिणीकडे जाऊन तिला घेऊन या. त्याप्रमाणें सत्यभामेनें जाऊन सांगतांच, रुक्मिणी त्वरितगतीनें येऊन सीता होऊन, अर्धांगीं बसली.

त्यानंतर श्रीकृष्ण गरुडास ह्मणाला-तूं मारुतीजवळ जाऊन श्रीरामानें भेटावयास बोलाविलें ह्मणून सांग. तेव्हां गरुड खालीं मान घालून स्फुंदत ह्मणाला-आतां तो माझा प्राण घेईल. मग कुमारांस ह्मणाला-तुह्मीं जाऊन माझा निरोप सांगा. ते ह्मणाले--आह्मांला तो समुद्रांत बुडवील. नंतर उद्धव अक्रूर व गरुड यांस पाठविलें. त्यांनीं मारुतीस नमन करून, अयोध्यापती बोलावितो आहे, असें सांगतांच, त्याला प्रेम न आवरून उद्धव अक्रूराच्या चरणांवर मिठी घातली व रघुनाथ सत्वर दाखवा ह्मणून पुनः पाय धरले. नंतर तिघेजण पुढें चालले, गरुड भीतीनें मागाहून येत होता.

इकडे श्रीकृष्ण द्वारकेची अयोध्या करून, सिंहासनावर रामरूपानें बसला होता, तोंच मारुती येऊन रामरूप पाहतांच, लोटांगण घातलें. त्याला श्रीरामानें आलिंगन देऊन आपल्या उजव्या बाजूस बसविलें. मग मारुती वर पाहूं लागला तों कृष्णरूप दिसलें, त्याबरोबर चंचल झाला. तेव्हां रमानाथ बोलला-मारुते ! रामावतारांतील गोष्टींचें स्मरण कर कीं, द्वापारीं कृष्ण अवतारांत भेट देईन. असें ऐकतांच मारुतीला



सर्व यादव रैवत पर्वतावर महाशक्तींचे यात्रेस जात असतां
अर्जुन, सुभद्रेचें हरण करित आहे.

Joshi Art P. Works, Bombay. 1

मागील वचनाची आठवण होऊन ह्मणाला—आतां रामरूप धरून माझी बोळवण करावी.

असें ऐकतांच, श्रीकृष्ण पुनः अयोध्यानाथ होऊन, मारुतीचा गौरव केला. सर्वांस भोजनें घातलीं. शेवटीं श्रीहरी मारुतीस ह्मणाला-मी अर्जुनाचा सारथी होईन, तूं ध्वजस्तंभावर बसावें. मग भूभार उतरून टाकूं. असें ऐकतांच, बरें आहे असें सांगून नमन करून मारुती व नारद तीर्थाटनास गेले. अशा-प्रकारें सत्यभामा, गरुड व यादव यांचा गर्व हरण केला.

अध्याय ३२ वा.

नारदास स्त्रीदान, प्रद्युम्न अनिरुद्ध सांब-विवाह, अर्जुनाची तीर्थयात्रा, मारु-तीशीं पण व सुभद्राहरण.

एके दिवशीं नारदमुनी नदींत स्नान करित असतां, एक मच्छ व मच्छिणी रमतांना पाहिलीं; तेव्हां मनांत ह्मणाले—स्त्री-शिवाय संसार व्यर्थ होय, अद्यन पुत्रमुखही पाहिलें नाहीं. बरें आतां लग्न करावें तर बायको वाढेल कधीं ? तरी आतां कृष्णाची भेट घेऊन, त्याच्या सोळा हजार स्त्रियांतील एक स्त्री मागून घ्यावी. असा विचार करून, श्रीकृष्ण रुक्मिणीच्या मंदि-

रांत बसला होता तेथें आला. त्याची कृष्णानें पूजा केली आणि ह्मटलें–स्वामी, काय आज्ञा आहे ? आज आपली वासना चंचल कां दिसते ?

नारद ह्मणाला–घननीळा ! गृहस्थाश्रम केला नाहीं, त्यामुळें आमचा काळ व्यर्थ गेला. तरी तुला पुष्कळ स्त्रिया आहेत त्यांतील एक मला दे. स्त्रीदान करील त्याच्या पुण्यास पार नाहीं. असें ऐकून श्रीहरी ह्मणाला–जिच्या घरीं मी नसेन ती स्त्री तूं घेऊन जा. मग नारद बरें ह्मणून दुसरीच्या मंदिरांत गेला तेथें जगत्पती बसला असून, उद्धव अक्रूर उभे होते. मग श्रीहरीनें नारदमुनी ! यावें यावें असें बोलून प्रीतीनें आलिंगन दिलें. नारद विचार करूं लागला, हा लाघवी मुरारी कपटी आहे; आतां रुक्मिणीच्या घरीं होता आणि इतक्यांत येथें कसा आला? तेथून तिसरीच्या घरीं गेला तेथें सारीपाट खेळत बसला होता; मग चवथीच्या घरीं जाऊन पाहतो तों श्रीकृष्ण झोंपी गेला आहे.

अशा रीतीनें नारद श्रीकृष्णाच्या स्त्रियांचीं सर्व घरें फिरला. परंतु कृष्णाशिवाय एकही स्थळ रिकामें मिळालें नाहीं. मग लज्जित होऊन ह्मणाला–मी कर्मानें नाडून अज्ञान आवरणांत पडलों. असें मनांत आणून, भागीरथींत जाऊन स्नान करूं लागला. तों मायेनें कौतुक करितांच नारद स्त्रीरुप झाला. इतक्यांत तेथें एक पुरुष येऊन, उभयतांचा

संग होतांच, नारदी गरोदर होऊन, जे प्रभव विभवादिक साठ संवत्सर तेच साठ पुत्र झाले. तेव्हां नारद विचार करूं लागला कीं, मला स्त्रियेचें ध्यान लागलें तेंच रूप मला प्राप्त झालें ! नंतर श्रीकृष्णाचें स्मरण करितांच नारद पूर्ववत् होऊन, स्नान करून बाहेर आला आणि दारुण तप आचरला. त्याच्या योगें दोषतृण दग्ध झालें.

पुढें द्वारकेस असें वर्तमान झालें कीं, भोजकट नगरांत रुक्मिणीचा बंधु रुक्मया राहात असे. त्यानें आपली लावण्य-वल्ली कन्या प्रद्युम्नास दिली व रुक्मयाचा पुत्र रुक्मध्वज त्याची कन्या पद्माक्षी अनिरुद्धास देऊन यथाविधी लग्न लाविलें. त्यावेळीं सर्व राजे सभेंत बसले असतां, रुक्मया बळरामास पण लावून द्यूत खेळूं या ह्मणून बोलूं लागला. मग पहिला पण हजारांचा लाविला तो रुक्मयानें जिंकला. मागून लक्षाचा पण लाविला तो बळरामानें जिंकला. तेव्हां रुक्मया खोटें बोलून मी पण जिंकलों असें बोलूं लागला. त्यावेळीं बळरामास क्रोध येऊन, राजांस विचारूं लागला. त्यांनींही असत्य भाषण केलें. तोंच आकाशवाणी झाली कीं, बळरामानें डाव जिंकला. त्याबरोबर राजे चकित झाले, व रुक्मया खड्ग तोडण घेऊन युद्धास उभा राहिला. असें पाहतांच बळरामानें मंडपाचा खांब उपटून रुक्मयाचें मस्तक चूर्ण केलें; त्याबरोबर सर्व राजे पळूं

लागले, तोंच रुक्मिणीपति धांवत आला, त्यानें रुक्मयाचें प्रेव पाहिलें. मग त्यास अग्नि देऊन त्याच्या पुत्रावर छत्र धरिलें आणि वोहरें घेऊन द्वारकेस आला.

यावर जांबुवंतीचा पुत्र सांब, यानें विचित्र कौतुक केलें; तें असें—हस्तनापुरच्या दुर्योधनाची कन्या, हिचें स्वयंवर चाललें असतां देशोदेशींचे राजे आले होते. तेथें सांवही आला. दुर्योधनानें कन्येच्या हातांत माळ देऊन, आवडेल त्यास माळ घालण्यास सांगितलें. तोंच सांब उठून, नोवरीस उचलून रथावर घेऊन द्वारकेचा रस्ता धरिला. त्यावेळीं एकच हाहाःकार होऊन, दुर्योधन शंभर भावांसह त्याच्या मागें लागला. तेव्हां सांबानें रथ मागें फिरवितांच तुंबळ युद्ध जुंपून, सांबास पाशांत धरून, हस्तनापुरांत आणून बंदींत ठेविलें. राजे आपापल्या स्थानीं गेले व कन्या तशीच घरीं ठेविली.

इकडे नारदानें द्वारकेंत जाऊन, सर्व वृत्त कृष्णास कळवितांच, दळभार सिद्ध केला. तों प्रद्युम्न ह्मणाला—मी आतांच जाऊन, बंधूच्या कैवारें कौरवांचीं शिरें छेदून वोहरें घेऊन येतों. इतक्यांत बळराम ह्मणाला—कौरव पांडव आप्तवर्ग त्यांशीं युद्ध करूं नये. मीच तिकडे जाऊन येतों. माझें वचन न ऐकतील तर हस्तनापुर पालथें घालीन. असें बोलून अक्रूर उद्धवासह बळराम गजपुरासमीप येऊन, उप-

वनांत राहिला, आणि दुर्योधनास भेटून जावें ह्मणून सांगून पाठविलें. निरोप पोंचतांच दुर्योधन बंधूंसह बाहेर आला. त्याला बलरामानें भेटून सन्मान देऊन बसविला, आणि ह्मटलें-आमचा मुलगा स्वयंवर पाहण्यास आला, तो कन्या घेऊन गेला ह्मणून तुह्मीं विचार न करितां बंदींत ठेविला, त्यावरून श्रीकृष्ण तुमचेवर कोपला आहे.

तेव्हां दुर्योधन क्रोधानें ह्मणाला—आमच्या धर्मानें तुह्मीं द्वारकेंत नांदत असतां, बळेंकरून नवरी न्यावी हा तुमचा कुळधर्म काय ? तुमचा कृष्ण, प्रद्युम्न युद्धास येऊं द्या. समस्तांचें एकाच बाणानें कंदन करीन. असें बोलून भावांसह उठून गेला. इकडे बलरामानें हस्तनापुराचे मध्यभागीं नागर रोंवून हालवूं लागला; त्यामुळें नगर डळमळून घरें खचून लोक पळूं लागले. तेव्हां दुर्योधनानें भीष्म द्रोणाचे चरण धरून, बलरामास शांत करण्यास सांगितलें. भीष्म ह्मणाला—त्यांचा कुमर व्यर्थ धरिला आहे, मग तो कसा शांत होईल. मग भीष्म, द्रोण विदुर दुर्योधनादिक कौरव नगराबाहेर येऊन बलरामास नमस्कार करून, दुर्योधन चरणीं लागून ह्मणाला—या क्षणीं क्षमा करावी. राम बोलला—नगर समुद्रांत पालथें घालीन. कौरव ह्मणाले—त्यांत तुमचा पुत्र मरण पावेल. बलरामानें सांगितलें—आमचा कुमर मरण पावला तर समुद्र आणून देईल.

असा बळरामाचा निकर पाहतांच, भीष्मानें चरण धरून क्षमा मागितली. तेव्हां राम शांत होऊन नागर उपटिला. मग बंदींतून कुमारास सोडून यथाविधी विवाह केला. नंतर बलराम वोहरें घेऊन द्वारकेंत आला व उद्धव अक्रूरानें श्रीहरीस वर्तमान सांगितलें.

यावर धर्मराज इंद्रप्रस्थीं असतां, अपूर्व कथा वर्तली. ती अशी कीं, पूर्वीं श्रीव्यासांनीं द्रौपदीस पांच पती नेमिले, तेच पांच पांडव होत. त्या प्रत्येकास नारदानें दोन महिने आणि बारा दिवस वांटून दिले. एकाचे दिवस पूर्ण होतांच द्रौपदी अग्नींत स्नान करून शुचिर्भूत होऊन, दुसऱ्याजवळ जात असे. असो. एक ब्राह्मण अर्जुनास सांगूं लागला कीं, माझ्या गाई दैत्यांनीं वळून नेल्या, त्या तुजवांचून कोण सोडवील ?

असें ऐकतांच, अर्जुनानें सेवकांस शस्त्रें आणावयास सांगितलीं. सेवक म्हणाले—धर्मद्रौपदी एकांतीं आहेत. असें ऐकतांच पार्थास संकट पडलें. तरी तो तसाच सदनांत प्रवेशला. त्यावेळीं धर्मद्रौपदी संभोग व्यसनीं गुंतलीं होतीं. अर्जुनास पाहतांच द्रौपदी लज्जित झाली. पार्थानें शस्त्रें घेऊन, दैत्यांस मारून द्विजाच्या गाई सोडविल्या व घरीं येऊन, पंडितांस वृत्तांत सांगून, स्त्रीपुरुषांचा एकांत पाहिल्यानें दोष

काय ह्मणून विचारलें ? ते ह्मणाले–बाळहत्येचें पातक घडलें, त्यास प्रायश्चित्त पृथ्वीवरील तीर्थे हिंडावीं.

नंतर धर्माची आज्ञा घेऊन, पार्थ तीर्थे करण्यास निघाला. तो तीर्थे फिरत काम्यक वनांत शिवाचें अनुष्ठानस्थळ होतें तेथें जाऊन बसला. इतक्यांत शिव येऊन, तूं येथें कोण व कां बसलास ह्मणून विचारलें. पार्थ बोलला–तुला विचारण्याचें कारण काय ? शिव ह्मणाला–हें स्थान माझें आहे. पार्थ बोलला–तुझा ठाव काय नेमिलेला आहे ? असें ऐकतांच शिव कोपून दोघांचें युद्ध जुंपलें. शिवानें जितकीं शस्त्रें टाकिलीं तितकीं पार्थानें निवारिलीं. तेव्हां शिवानें संतोषून, नांव खूण सांगून वर मागण्यास सांगितला.

पार्थ ह्मणाला–मी श्रीकृष्णदास पांडुनंदन, माझें नांव अर्जुन. मग शिवानें त्याला कवच किरीट कुंडलें प्रसाद दिलीं. तेथून अर्जुन रामेश्वरीं आला. तों मारुतीची गांठ पडली. तेथील सेतु कोणी बांधिला ह्मणून मारुतीस पार्थानें विचारलें. मारुतीनें पूर्व वर्तमान कथन करून रामानें सेतु बांधिला ह्मणून सांगितलें. तेव्हां पार्थ हांसून ह्मणाला–एवढें रामाचें सामर्थ्य; मग बाणांचा सेतु न बांधितां शिळेचा कां बांधिला ? मारुती बोलला–एकेक वानर पर्वतासारखा, त्यांच्या पुढें बाणांचा सेतु कसा टिकेल ? अर्जुनानें सांगितलें–माझ्यासारखा असता तर बाणांचाच सेतु बांधिला असता.

असें ऐकतांच मारुतीस राग येऊन ह्मणाला—तर मग तूं आतां सेतु बांध, मी तो मोडून टाकितों. मग पार्थानें एक योजन बाणांचा सेतु बांधिला आणि प्रतिज्ञा केली कीं, जर हा सेतु तूं मोडलास तर मी अग्निकाष्टें भक्षण करीन. मारुतीनें सांगितलें—जर मी सेतु न मोडला तर तुझ्या ध्वजस्तंभावर बसेन. नंतर अर्जुनानें बांधलेल्या सेतूचें मारुतीनें उडी मारून चूर्ण केलें. त्याबरोबर बोलल्या प्रमाणें अर्जुन अग्नींत उडी टाकण्यास तयार झाला; तोंच श्रीकृष्ण ब्राह्मणरुपानें येऊन, पार्थास विचारूं लागला कीं, बाबा ! अग्नींत उडी कां टाकित आहेस ? तेव्हां पार्थानें सर्व वृत्त कथन केलें.

तें ऐकून, ब्राह्मण ह्मणाला—कोणताही पण साक्षीशिवाय पुरा होत नाहीं. माझ्या देखत जर अशी गोष्ट होईल तर मी ती खरी मानीन. मग पार्थानें पुनः सेतु बांधिला. त्या खालीं श्रीकृष्णानें आपलें सुदर्शन घालून ठेविलें. नंतर मारुतीनें उडी टाकितांच, तो एकीकडे आदळून पडला पण सेतु मोडला नाहीं. त्याचवेळीं पार्थानें कृष्णास ओळखिलें. मग श्रीहरीनें रामरूप दाखवून मारुतीस सांगितलें कीं, तूं रामावतारीं सेवा करून सुख दिलेंस, आतां तूं मी व अर्जुन मिळून दुष्टांचा संहार करूं. हा अर्जुन तुझा आहे, याचा सांभाळ कर असें सांगून श्रीकृष्ण द्वारकेंत आला.

श्रीकृष्णाची बहीण सुभद्रा ही अर्जुनास देऊं केली होती, परंतु अर्जुन तीर्थयात्रेस गेल्यामुळें, बळरामानें तो बेत फिरवून दुर्योधनास देण्याचा निश्चय केला. पण तो कृष्णाच्या मनास आला नाहीं. त्याच्या मनांत अशा प्रसंगीं अर्जुन येथें येऊन पोंचावा, ही त्याचीच माया होय. त्याप्रमाणें पार्थ तीर्थें करित द्वारकेस आला. तों सेवकांकडून कोणी तपस्वी आल्याचें कृष्णास कळलें. मग त्याच्या भेटीस जातांच, एकमेकांनीं मनांत ओळखून आनंदित झाले. ती बातमी कृष्णानें सर्वांस सांगतांच बळरामानें त्यास घरीं बोलावून आणून चार महिने राहविलें.

नंतर सर्व यादव रेवतपर्वतावर महाशक्तीचे यात्रेस निघाले. त्यावेळीं कृष्णार्जुन एका रथांत बसून चालले. तों पार्थाची दृष्टी सुभद्रेकडे जातांच हास्यवदन केलें. तेव्हां कृष्ण थट्टेनें ह्मणाला–तुह्मीं तपस्वी असतां, असें भलतीकडे चित्त कां गुंततें ? अर्जुन बोलला–चित्त स्थिर होय असें करावें. मग कृष्णानें अर्जुनास सांगितलें कीं, यात्रा करून परत येतांना माझ्या रथावर बसून, या सुभद्रा रत्नाचें हरण करावें. मग पर्वतावर जाऊन देवीपूजन, वनभोजनें झालीं. पुढें समय पाहून श्रीकृष्णानें अर्जुनास खूण करितांच, सुभद्रेस रथांत घेऊन, रथ इंद्रप्रस्थाकडे चालविला. मागें तापसी सुभद्रा घेऊन गेला, अशी हांक होतांच, यादववीरांनीं पाठलाग केला, त्याबरोबर

पार्थानें रथ मागें फिरवून आपलें स्वरूप प्रगट केलें. तोंच ध्वजस्तंभावर मारुती येऊन बसला, तो सर्वांनीं पाहिला. नंतर अर्जुनानें सैन्याची वाताघात केली.

असें पाहून बलराम युद्धास उठला व श्रीकृष्णास कित्येक शब्द टोंचून बोलून ही तुझीच करणी असें ह्मटलें. श्रीकृष्ण ह्मणाला—अर्जुनापेक्षां दुसरा वरिष्ठ वर कोणता ? राजहंसाची निंदा करून मुक्ताफळें कावळ्यांस अर्पावीं काय ? आतां जर याचेबरोबर युद्ध करावें तर तो मलाही नाटोपून प्रळय करील. असें ऐकतांच बलराम शांत झाला. मग वसुदेव देवकीनेंही बलरामाचें समाधान करतांच, यथाविधी लग्न करावें असें सांगितलें. नंतर अर्जुनास बोलावून आणून, मोठ्या थाटानें सुभद्रेबरोबर लग्न लाविलें. उग्रसेनानें भांडारें फोडून याचकजन सुखी केले. श्रीकृष्णानें अर्जुनास सुभद्रेसह एक वर्ष पुष्कर क्षेत्रीं ठेविलें. तेथें तीर्थयात्रेचीं बारा वर्षें पुरीं होतांच, तीं उभयतां धर्मास भेटून सर्व वृत्त कथन केलें. मग पार्थ सुभद्रेस हातीं धरून द्रौपदीच्या मंदिरांत गेला; तेव्हां तिच्या मनांत जरी संतोष वाटला होता तरी बाह्यात्कारें रुसून थट्टेनें ह्मणाली—आतां इकडे येण्याचें तुमचें काम काय ? नवीन वस्त्र मिळाल्यावर जुन्यास कोण विचारतो ? असें बोलून द्रौपदी व सुभद्रा एकमेकींस भेटल्या.

———

अध्याय ३३ वा.

एकदां नारद यमसभेस येतांच, यमानें त्याचें पूजन केलें. तेथें पांडुराज पुण्यदेह पावून बसलेला नारदानें पाहिला. तेव्हां पांडुराज नारदास ह्मणाला–स्वामी ! तुह्मी मृत्युलोकीं गेल्यास माझ्या पुत्रांस सांगा कीं, जर राजसूय यज्ञ कराल तर मी इंद्रसभेस जाऊन बसेन. येथें यमही मला मान देतो परंतु येथिल जीवांची जाचणी पाहून, चित्तास खेद होतो. पुत्र राजसूय यज्ञ करतील तर इंद्र आपल्या शेजारीं बसवून सुख देईल. हें ऐकतांच, हा निरोप धर्मास मी अवश्य कळवितों, असें सांगून नारद इंद्रप्रस्थास आला.

धर्मानें त्यास पाहतांच, साष्टांग नमस्कार करून, दिव्यासनावर बसवून पूजा केली. मग नारद ह्मणाला–तुमचा पिता मला स्वर्गी भेटला होता. त्याचा निरोप असा आहे कीं, तुह्मी राजसूय यज्ञ कराल तर मी इंद्राशेजारीं बसेन. असें सांगून नारद ऊर्ध्वपंथें गेल्यावर धर्म बंधूस बोलावून विचार करूं लागला. ते ह्मणाले–पितृवचन जर सफळ झालें नाहीं तर व्यर्थ वांचून काय उपयोग ? बापाचें वचन

जो पुत्र व्यर्थ दवडतो तो प्रत्यक्ष जंत जन्मला व त्याचा भूमीस भार झाला असें जाणावें. नंतर भीमार्जुन ह्मणाले-पृथ्वींचे राजे बळें जिंकून द्रव्य आणलें पाहिजे, तरच यज्ञ सिद्धीस पावेल व द्वारकानाथ श्रीकृष्ण आल्याशिवाय कार्य-सिद्धी होणार नाहीं. मग धर्मराजानें श्रीकृष्णास दिव्यपत्र पाठविलें. इकडे बावीस हजार राजे जरासंधाच्या बंदींत पडले होते, त्यांनींही कृष्णास पत्र पाठविलें होतें कीं, आमची बंदींतून सुटका करावी. अशीं दोहोंकडून पत्रें आल्यामुळें प्रथम धर्माकडे जाऊन हा कार्यभाग साधण्याचें कृष्णानें ठरविलें होतें.

नंतर धर्मानें अपार सेना जमवून, चौघां बंधूंस बरोबर देऊन चार दिशांस पाठविलें. पूर्वेस भीम, उत्तरेस अर्जुन व दक्षिणेस सहदेवास पाठविलें. त्यांनीं त्या त्या दिशेकडील राजे जिंकून अपार द्रव्य आणिलें. पश्चिमेस नकुळ गेला होता त्यानेंही राजे जिंकून, द्वारकेजवळ गेला व नगरा-बाहेरूनच श्रीकृष्णास पत्र पाठविलें. तें पाहतांच बाहेर येऊन नकुळास भेटून अपार द्रव्य दिलें आणि धर्माकडे पाठविला व मीही मागाहून येतों असा निरोप सांगितला.

कृष्ण इंद्रप्रस्थास आल्यावर, धर्मानें त्याची पूजा करून सर्व वर्तमान सांगून ह्मटलें—एका जरासंधाशिवाय नव-

खंडांतील सर्व राजे जिंकून इतकें द्रव्य आणिलें आहे कीं, हजार वर्षे नित्यशः हजारों हत्ती भरून नेले तथापि संपणार नाहीं. मग कृष्ण ह्मणाला–जरासंधाच्या बंदींतील राजे सोडविले नाहींत; तर सर्व जिंकून उपयोग काय ? यास्तव त्या राजांची सुटका केलीच पाहिजे. नंतर जरासंधावर स्वारी करण्याचा विचार होऊन, अर्जुन, भीम यास बरोबर घेऊन श्रीकृष्ण मागधपुरास जाण्यास निघाला. ते मागधपुराजवळ येतांच, त्यांनीं ब्राह्मणांचीं रूपें घेऊन, ग्रामदुर्ग फोडून मधूनच नगरांत शिरले. पुढें मोठमोठ्या भेरी, नगारे होते ते भीमानें फोडून टाकून राजद्वारीं यज्ञशाळेंत जाऊन बसले. त्यावेळीं जरासंध काकबली देण्याकरितां बाहेर आला होता. त्यानें त्यांस नमन केलें. परंतु ते कांहींच बोलले नाहींत. नंतर जरासंध ह्मणाला–द्विजहो ! तुमची काय इच्छा असेल ती सांगा. हरि ह्मणाला–ति घांतून एकाशीं युद्धभिक्षा द्यावी.

असें ऐकतांच, जरासंधानें हाताकडे पाहिलें तों गोधांगुळी चिन्ह दिसलें. त्यावरून हे ब्राह्मण नसून क्षत्रिय आहेत असें ओळखलें. मग जरासंध ह्मणाला–तुह्माला मी युद्धभिक्षा दिली; परंतु तुह्मी कोण आहां तें मला सांगावें. तोंच तिघांनीं आपलीं स्वरूपें प्रगट केलीं. मग चौघेजण नगरा-

बाहेर येऊन युद्धभूमिका नीट करून, भीम व जरासंध गदा घेऊन युद्धास मिसळले. ते नवदिवस नवरात्री लढत होते. शेवटीं श्रीकृष्णानें गवताची काडी उभी चिरून संकेत दाखविला कीं, जरासंधास पिंजून टाक. त्याप्रमाणें भीमानें तीन चार वेळ केलें; परंतु तो पुनः एकत्र होऊन भीमावर धांवत येई. नंतर श्रीकृष्णानें एक दुसरी काडी चिरून दोन हातांत दोन घेऊन उजवीकडची डावीकडे व डावीकडची उजवीकडे फेंकून, अशा रीतीनें जरासंधास द्विधा कर; अशी खूण दाखवितांच, भीमानें तसें केलें, त्याबरोबर जरासंध प्राणास मुकला. मग बंदींतील राजे सोडवून, तेथील भांडारांतील द्रव्य इंद्रप्रस्थास पाठवून, जरासंधाच्या सहदेव पुत्रास राज्यावर स्थापिला व आपण सर्व मागून निघून आले आणि श्रीकृष्ण रथांत बसून द्वारकेंत गेला.

असे कांहीं दिवस लोटल्यावर धर्म बंधूंस ह्मणाला— यज्ञाची सर्व सामग्री सिद्ध झाली आहे. तरी आतां सप्तपुऱ्या, तीर्थें, येथील वेदांत ज्ञानी ब्राह्मण, शाण्णव कुळींचे राजे यांस बोलावणें पाठवावें. द्वारकेस दूत पाठवून आमचें कुलदैवत श्रीकृष्णनाथ यास रुक्मिणीसह पाचारण करावें. दुर्योधनादिक बंधु, विदूर यांसही बोलवावें. अशी आज्ञा होतांच, लक्षानुलक्ष दूत आमंत्रणास पाठवून दिले. श्रीकृष्ण

नाथ दूत पाठविण्यापूर्वीच निजभारासह नगराजवळ आला. त्यास धर्म बंधूंसह सामोरा जाऊन मंदिरांत आणिला. नंतर चौदाहजार मस्त हत्तींवरून आणिलेलें द्रव्य, अलंकार वस्त्रें यांनीं पांडुनंदनाची श्रीहरीनें पूजा केली. अठ्यायशीं हजार ऋषि शिष्यांसह आले. जरासंधाचे बंदींतील बावीस हजार राजांनीं करभार आणिला. कुबेरानें अपार धनाच्या राशी स्वर्गाहून पाठविल्या. बिभीषण, छप्पन्न देश, नवखंडांतील राजे, भीष्मद्रोणादिक कौरव आदिकरून आलेल्या सर्व मंडळीस धर्मराज सामोरे जाऊन त्यांचा सन्मान केला व अनेक जातींचीं रत्नखचित शिबिरें उभारून राहण्यास जागा दिली.

नंतर भीष्मास व कृष्णास एकासनावर बसवून, धर्मानें विनंति केली कीं, या कार्यास सामग्री मनासारखी आहे, परंतु कोणास कोणतें काम सांगावें त्याची योजना आपणच करावी. श्रीकृष्ण ह्मणाला-मी नंदाचा गाई राखणारा, अर्जुनाचा सारथी, आमचा धर्म दुसऱ्याची सेवा करण्याचा, तो मी ऋषींस इच्छित पदार्थ पुरवून उष्टीं काढण्याचें काम पत्करतों. अश्वत्थाम्यानें ऋषींस उपचार द्यावे, विदुरानें द्रव्य पुरवावें, राजपूजन संजयानें करावें, राजसेनांस भक्ष्य-भोजन दुःशासनानें द्यावें, द्रोणाचार्यानें ब्राह्मणांस दक्षिणा

द्यावी, राजांनीं आणलेलें धन दुर्योधनानें भांडारांत ठेवावें, येणारीं विघ्नें अर्जुनानें निवारावीं, भोजन वेळीं ब्राह्मणांची प्रार्थना भीमानें करावी; सुमनमाळा, गंधाक्षता, सुगंध नकुळानें द्यावा, पंचामृतें सहदेवानें वाढावीं, विप्रराजांच्या पंक्ती द्रौपदीनें वाढाव्या. तांबूलादि धृष्टद्युम्नानें द्यावे.

याप्रमाणें कामें वांटून दिल्यावर धर्मराज ऋषिमंडळासह यज्ञशाळेंत हवन करण्यास बसला. एक वर्षपर्यंत यज्ञ चालल्यावर अग्निनारायण तृप्त झाला. भोजन समयीं ब्राह्मण जेवीत असतां, भीम कठोर वचनानें बोले कीं, जर अन्न टाकाल तर शेंडीशीं बांधीन, माझा स्वभाव तुम्हांस ठाऊकच आहे. या भीमाच्या धाकानें ब्राह्मण शुष्क होऊन गेले. तें श्रीकृष्णानें जाणून भीमास सांगितलें कीं, गंधमादन पर्वतावर एक गंधमादन नांवाचा तपस्वी राहतो त्याचें येथें अगत्याचें कारण आहे, तरी त्यास तूंच जाऊन घेऊन ये. त्यावेळीं भीमास मीच बळानें मोठा असा अभिमान झाला. नंतर तो गंधमादनास आणावयास जात असतां एका मोठ्या पर्वताच्या मध्यभागीं वाटेंतच मारुती वृद्धवेष धरून, शेंपूट आडवें टाकून, भीमाचा मार्ग रोधून बसला होता. त्यास पाहतांच, भीम ह्मणाला–अरे वानरा ! मला गंधमादन ऋषीच्या दर्शनास जाणें आहे तरी तूं आपलें शेंपूट काढून

मला जाण्यास रस्ता दे. मारुती बोलला—बाबा ! मी आतां म्हातारा झालों; यास्तव मला तें उचलत नाहीं, तरी तूंच उचलून एका बाजूस ठेव.

असें ऐकतांच, तें शेंपूट उचलण्याकरितां भीमानें आपलें नऊ हजार हत्तींचें बळ खर्च केलें; पण तें शेंपूट जाग्यावरून हाललें नाहीं. तेव्हां मारुती हांसून म्हणाला—भीमा ! तुला आपल्या बळाचा गर्व झाला आहे हें नीट नाहीं. यास्तव निरभिमान होऊन जगदात्मा श्रीकृष्ण यास शरण जा. असें ऐकून भीम गर्वरहीत होऊन मारुतीची आज्ञा घेऊन गंध-मादन पर्वतावर गेला. तेथें त्यानें सुवर्णासारख्या कांतीचा परंतु मुख दुर्गंधीनें व्याप्त असा ऋषि पाहिला. त्यास श्रीकृष्णाचा निरोप कळविला. तेव्हां ऋषि म्हणाला—मला बोलाविलें खरें, परंतु माझें हें डुकरासारखें तोंड दुर्गंधीनें भरलेलें तेथें घेऊन कसें येऊं ? तेथील सर्व लोक मला हांसतील ! मग भीम म्हणाला—महाराज ! आपली स्थिति अशी होण्याचें कारण कोणतें ? ऋषि बोलला—मी सधन असतां, दान पुण्यें पुष्कळ केलीं; परंतु ब्राह्मणांस कठोर वचनानें बोललों, त्यामुळें माझी अशी दशा झाली आहे. भीमसेना ! तुला मी सांगतों कीं, जर तुझ्याकडे ब्राह्मणांचा परामर्ष घेण्याचें काम असेल तर ब्राह्मणसेवेंत किंचित्‌ही न्यून पडूं न देतां

त्यांस कांहीं कठीण वचनें बोलूं नको. नाहींतर माझ्या-सारखी अवस्था होईल. असें ऐकतांच भीमास पश्चात्ताप झाला.

नंतर भीम तेथून येऊन श्रीकृष्णास भेटला. कृष्णानें त्यास कमीजास्त कांहीं विचारलें नाहीं. दुसरे दिवशीं जेवणाचे वेळीं भीम ब्राह्मणांची प्रार्थना करूं लागला. त्याचा तो नम्रपणा पाहून ब्राह्मण ह्मणूं लागले कीं, आज याची बुद्धि अशी प्रसन्न कशी झाली ! त्याबद्दल त्यांस मोठें आश्चर्य वाटलें.

त्या राजसूय यज्ञांतील धर्माची संपत्ति पाहून, दुर्योधन संतापून ह्मणाला—याचा सहकारी कृष्ण आहे ह्मणून सर्व पूर्णता होते. मग कृष्णास ह्मणाला—तूं एवढा देव होऊन तुझ्याठायीं समता नाहीं, धर्म व मी या उभयतांमध्यें कपटभाव ठेवून, एकाचेंच साह्य करतोस ! श्रीकृष्ण ह्मणाला—मी सर्वांस सारखा आहे. पण माझ्यावर समदृष्टि पाहिजे. यास्तव तुह्मां दोघांस मी सांगतों तसें करा. असें बोलून, दुर्योधनास सांगितलें कीं, येथें इतके ब्राह्मण बसले आहेत त्यांतील दान देण्यास एक सत्पात्र शोधून आण, आणि धर्मास सांगितलें—तूं या ब्राह्मणांतील एक नष्ट निवडून आण. मग ते शोधावयास गेले. दुर्योधन ह्मणाला—सत्पात्र दानास एकही ब्राह्मण या मंडळींत नाहीं. मागाहून धर्म येऊन ह्मणाला—यांत एकही ब्राह्मण नष्ट दिसत नाहीं. तेव्हां कृष्ण दुर्योध-

नास ह्मणाला—तुझें हृदय कपटमलीन आहे व धर्माचें शुद्ध आहे ह्मणून धर्मास जे पुण्यवंत दिसतात तेच तुला दोषी वाटतात. असें ऐकतांच, दुर्योधन उगाच राहिला. असो.

एक वर्ष राजसूय यज्ञाचा उत्सव होत असतां, एक नवल झालें; तें असें कीं, जान्हवीच्या तीरीं कोणीएक तपस्वी ब्राह्मण, आपल्या स्त्रियेसह अरण्यांत गुंफा बांधून राहिला होता. तो शिवाचा उपासक असून, त्याला कैलासाहून माध्यानकाळीं विमान येत असे. त्यांत बसून तीं शिवार्चन करून आश्रमीं येत असत. एके काळीं तीं वनांत फुलें वेंचित असतां विमान येण्याची वेळ झाली होती, इतक्यांत त्या एकांत वनांत ब्राह्मण कामातुर होऊन स्त्रियेशीं भोगदान मागूं लागला. तेव्हां ती भ्रतारास ह्मणाली—सूर्यनारायण माध्यान्हीस आला असून, पुढें शिवपूजेस जाणें आहे. तरी ही गोष्ट मनांत आणूं नका. पण त्याला मदनानें वेडा केल्यामुळें इकडे तिकडे हिंडूं लागला. तोंच काळ सर्पानें दंश केला. त्याबरोबर त्याचा प्राण निघून गेला. तेव्हां त्याची स्त्री शोक करूं लागली, तों तेथें नारद येऊन काय झालें ह्मणून विचारूं लागला. तिनें सर्व वृत्त कथन करतांच, नारद ह्मणाला—भ्रताराचें वचन कां मोडलेंस ? मग तिनें आतां काय उपाय करूं ह्मणून विचारतांच, तें प्रेत व स्त्री

बरोबर घेऊन नारद इंद्रप्रस्थास येऊन, तिच्याकडून तें प्रेत धर्मराजाच्या मंडपांत टाकविलें व आपण निघून गेला.

तें प्रेत मंडपांत टाकल्यावर ती स्त्री ह्मणाली–मोठमोठे ऋषि या स्थानीं आहेत तर सर्वांनीं कृपा करून माझ्या पतीचें प्रेत उठविलें पाहिजे. तेव्हां सर्व चिंतेंत पडले. धर्मराजानें कृष्णास विनंती केली कीं, या यज्ञाचा अधिकार मजकडे नाहीं, हें आपण जाणतच आहां ! तरी आपण हें प्रेत जीवंत करावें. त्या स्थानीं कौरवादि दुर्जन होतेच, त्यांस विघ्न झालेलें पाहतांच आनंद झाला. ते ह्मणूं लागले—मेलेल्या प्रेतास जीवंत करणें हें कोणाच्या हातीं नाहीं. याचें निवारण आतां कसें होतें तें पाहूं या.

असें बोलून एकमेकांच्या हातावर टाळ्या देत आहेत, तोंच श्रीकृष्ण हातांत पाण्याची झारी घेऊन प्रेताजवळ आला, आणि हातांत पाणी घेऊन ह्मणाला–जर मी आजन्म ब्रह्मचारी असेन तर हें प्रेत आतांच उठून बसेल. बालब्रह्मचारी असें ह्मणतांच कौरवादिक दुर्जन ह्मणूं लागले कीं, गोकुळांतील गवळ्यांच्या स्त्रिया यानें ठेविल्या नाहींत ! याला सोळा हजार स्त्रिया ! तेव्हां हा ब्रह्मचारी कसा ! अशा याच्या पुण्याच्या पाण्यानें प्रेत कसें उठेल ! असें बोलत आहेत, तोंच प्रेतावर पाणी पडल्याबरोबर तें उठून बसलें. असें पाहतांच सर्वांस आश्चर्य वाटून जयजयकार झाला. मग धर्मानें त्यास

धन देऊन स्त्रीसह विमानांत बसवून स्वस्थानीं पाठविलें. इतक्यांत यज्ञकुंडांतून एक कोल्हा बाहेर येऊन, तो कुंडवेदिकेवर बसून बोलला कीं, या सभेंत एकाचा शिरच्छेद होईल व चौदाव्या वर्षाच्या आरंभीं कौरव पांडवांत कलह माजून, पुढें जितके धर्ममंदिरांत राजे आले आहेत तितके आटतील. असें कोल्हा बोलून अदृश्य झाला. असो. पुढें ब्राह्मणहस्तानें स्वाहाकार चालू झाला.

अध्याय ३४ वा.

राजसूय यज्ञ, द्रौपदीची थट्टा व शुकमुनीदर्शन.

धर्मराजाकडे राजसूय यज्ञ मोठ्या थाटानें होत असतां, नित्य अन्नसंतर्पण होऊन, यज्ञ हवनादि कर्में करणारे ब्राह्मण आनंदानें जेवित होते. त्या अन्नाच्या सुवासेंकरून सुरगण लाळ घोंटीत असत. जेथें अन्न पुरविणारा इंदिरावर तेथें काय कमी असणार ? त्या ठिकाणीं लक्षानुलक्ष जेवणाऱ्या ब्राह्मणांस एकटी द्रौपदी वाढीत असे. तिचे श्रम कृष्णमुख पाहतांच हरण होत असत. ब्राह्मण जेवून उठतांच, राजांच्या

पंक्ती व दुर्योधनादिक कौरव भोजनास बसले. फक्त पांडव व जगत्पती मागें राहिले.

द्रौपदी कौरव पंक्तींत वाढित असतां, तिच्या चोळीचें बिरडें अकस्मात् तुटून, पदर एकीकडे गेला व वक्षस्थळ उघडें पडलें. त्याबरोबर द्रौपदी हात आंखडून, घाबरी होऊन पाहूं लागली. त्यावेळीं शकुनी, सुयोधन, कर्णादिक कौरव थट्टा करून, जो तो अन्न आण ह्मणून बोलूं लागला. एक ह्मणाला—अरे ! अन्नाचा दुष्काळ पडला, चला उठा. तेव्हां द्रौपदी लज्जित होऊन तिचें मुख उतरून गेलें. मग धांवा करून ह्मणाली—श्रीरंगा ! तुला हें कळत नाहीं काय ? असें बोलून कृष्णमुख पाहिलें. तोंच श्रीकृष्णानें द्रौपदीच्या अंतरांत प्रवेश करून, दुसरे हात फोडून चतुर्भुज केली. त्याबरोबर दोन हातांनीं चोळीचें बिरडें घालून पदर सांवरला व ज्यांनीं जे जे पदार्थ मागितले ते ते त्यांच्या पुढें वाढिले.

तेव्हां भीमास क्रोध येऊन दुर्जनांस ह्मणाला—जर अन्न सांडाल तर शेंडी उपटून हातांत देईन. असें ऐकतांच, दुर्जनांनीं माना खालीं घातल्या. नंतर द्रौपदी घरांत जातांच, तिच्या मागून कृष्णही गेला; त्याच्या चरणास तिनें मिठी घातली. धर्म ह्मणाला—जगन्नाथा ! तुझे कोंणते उपकार आठवूं ? आह्मांस माता पिता भयत्राता तुजवांचून दुसरा कोणी नाहीं.

अशा प्रकारें एक वर्षपर्यंत राजसूय यज्ञ होत होता. सर्वांचीं भोजनें झाल्यावर पांडवांसह श्रीकृष्ण, कुंती, द्रौपदी अशीं आठ-जणें पंक्तीस बसत असत. नित्य ब्राह्मणांचीं उष्टीं कृष्ण काढित असे. एका पंक्तीला लक्ष ब्राह्मण अशा अमित पंक्ती नित्य होत असून, कोटि संख्या होतांच स्वर्गांत एका घंटेचा नाद होई.

तो महोत्सव पाहण्याकरितां वेदव्यासनंदन शुकमुनी तेथें येऊन, धर्माच्या यज्ञांतील उच्छिष्ट अन्न सेवन करावें असें मनांत आणून, उष्ट्या पत्रावळींचे ढीग पडले होते; तेथें जाऊन शितें वेंचून खाऊं लागला. त्यावेळीं स्वर्गांत घंटेचा एकसारखा नाद वाजूं लागला. तो ऐकतांच धर्मानें असें होण्याचें कारण काय म्हणून कृष्णास विचारिलें. तेव्हां कृष्ण म्हणाला—येथें कोणी तरी महान् ब्रह्मवेत्ता येऊन जेवला असावा. असे ब्रह्मवेत्ते पृथ्वीवर चार आहेत; कपील, याज्ञवल्क्य, शुक व चौथा दत्तात्रेय होय. मग धर्मानें तो मला दाखवावा असा आग्रह धरतांच, कृष्णानें धर्मास बाहेर आणून, शुकाच्या रूपानें व्यासपुत्र उच्छिष्ट भक्षण करित असलेला दाखविला. तोंच धर्मानें त्याचे चरण धरले. शुकानें कृष्णास पाहतांच, आपलें रूप पालटून धर्मास दृढालिंगन दिलें. नंतर कृष्णानें त्याला मंडपांत व्यासाजवळ आणून, धर्माकडून पूजन करविलें. अशा प्रकारें एक वर्षानें यज्ञ संपूर्ण झाल्यावर, दैत्यांत वि-

धीचा अवतार व पांडवांचा मित्र मयासुर यानें जी अवर्णनीय सभा रचिली होती तीं सर्वांस दाखवून, त्या सभेंत योग्य स्थानीं ऋषि, राजे यांस बसविलें.

नंतर धर्मानें भीष्मास विचारिलें कीं, येथें अग्रपूजेचा अधिकारी कोण ? तेव्हां भीष्म ह्मणाला—या ब्रह्मांडांत श्रीकृष्णावांचून कोणी श्रेष्ठ नाहीं. यास्तव त्यालाच अग्रपूजा अर्पण करावी. असें ऐकतांच, धर्मराजानें श्रीकृष्णास रत्नखचित चौरंगावर बसवून, स्तुति करून मोठ्या समारंभानें अग्रपूजेचा मान अर्पण केला, व सर्वांस अहेर, वस्त्रालंकार वांटले. त्यावेळीं जयजयकार होऊन, देवांनीं पुष्पवर्षाव केला. परंतु श्रीकृष्णास पुजल्यामुळें दुर्जनांस क्षोभ आला. पुढें शिशुपाळाचें शिर श्रीकृष्ण उडवील.

अध्याय ३९ वा.

शिशुपाल व वक्रदंताचा वध.

धर्मराजानें अग्रपूजा कृष्णास देतांच शिशुपालादिकांस क्षोभ आला व ते एका सभेस बसून, कृष्णास द्वेषी नजरेनें पाहूं लागले. नंतर धर्मानें भिष्मास विचारलें कीं, आतां कोणाची पूजा करूं? तेव्हां शिशुपाळ बोलला—रे धर्मा! तुह्मी सर्व नीच मूर्ख आहां; आधीं गोरक्षक पुजून माथां अपेश घेतलेंत! त्या गोरक्षकाचे दोन बाप व तुह्मां पांडवांचे पांच बाप! यास्तव दोघांचीं चित्तें एक झालीं. मोठे मोठे ऋषि, राजे सांडून त्या अमंगळाची पूजा केलीत? त्यामुळें तुह्मीं आमचें नाक कापलेंत! असें बोलून हातांत शस्त्र घेऊन आमचे संगाती चला उठा; असें ह्मणतांच, कृष्णद्वेषी कोल्हाळ करित उठले. तोंच धर्मानें शिशुपाळास कवळून धरून ह्मटलें—तूं आमचा बंधु व हा यज्ञ तुझाच आहे. तुझ्यापेक्षां जाणत्या पंडितांसही कृष्णपूजनानें आनंद झाला, मग तुझ्या मनांत हा अनर्थ काय ह्मणून प्रवेशला? भीष्म ह्मणाला—त्याचें समाधान कां करतोस? त्याचें मरण

जवळ आलें. आह्मीं ज्याचें पूजन केलें त्याला शंकर ब्रह्मदेव इंद्रही शरण जातात; मग हा दुर्जन कां दुखावला ?

असें भीष्म बोलतांच सहदेवास आवेश चढून ह्मणाला— आह्मीं वैकुंठनाथ सभास्थानीं यथार्थ पूजिला आहे. जो कृष्णाची निंदा करील त्याची जिव्हा घ्राण छेदून, त्याला गाढवावर बसवून लावीन. असें बोलतांच, देवांनीं जय-जयकार करून पुष्पवर्षाव केला. तोंच नारद ह्मणाला— ज्यानें कृष्णनिंदा केली त्यास अनर्थ जवळ आला. त्याला जननी व्यर्थ प्रसवली. असें ऐकतांच शिशुपाळ दुर्जनांसह संग्रामास उभा राहून बोलला—या वेळीं पांडव, भीष्म, कृष्ण यांचें भस्म करीन. मग धर्म भीष्मास ह्मणाला—आतां कसें करावें ? भीष्मानें सांगितलें तूं स्वस्थ राहा. जोंपर्यंत श्रीकृष्ण पंचानन निद्रिस्थ आहे तोंपर्यंतच हे जंबूक गर्जना करतील. हा ज्वाळमाळी श्रीरंग अर्धक्षणांत यांचें भस्म करील.

असें ऐकून शिशुपाळ भीष्मास ह्मणाला—हे दुष्टा वृद्धा ! आमची निंदा करतोस ? तुझी जीभ कां झडेना ! हा कपट-नाटकी स्वधर्मनष्ट गोवळा याचा पुरुषार्थ वाखाणतोस ? मूढा ! लोकांस धर्म सांगतोस आणि तूंच अधर्म करतोस ? अशी निंदा ऐकतांच भीम गदा सांवरून धांवला. तोंच

भीष्मानें भीमाचा हात धरून स्वस्थ केला व सांगितलें, याचें आयुष्य आतां किंचित् उरलें आहे तेव्हां शिशुपाळ भीष्मास ह्मणाला–कृष्ण, भीम, अर्जुन तिघेही मजवर येऊं देत; तूं विलंब करशील तर तुझें नांव षंढ होय.

अशीं वचनें बोलला तरी तीं भीष्मानें सहन करून भीमाला ह्मटलें–पूर्वीचा वृत्तांत तुला सांगतों ऐक. दम-घोषाची स्त्री सात्यवती ही वसुदेवाची बहीण, तिच्या पोटीं हा शिशुपाळ जन्मला. त्याला चार हात व तीन डोळे ह्मणजे कपाळावर तिसरा नेत्र होता. लोक हें अवचिन्ह ह्मणूं लाग-तांच, त्याची आई याला बाहेर नेऊन टाका असें सांगूं लागली. तों आकाशवाणी झाली कीं, या बाळास टाकूं नको. हा पुढें महाभूपती होईल. याचें नांव शिशुपाळ असें ठेव. असें ऐकतांच, मातेनें याचा मृत्यु कोणाच्या हातीं ह्मणून विचारलें. तेव्हां पुनः वाणी झाली कीं, ज्या पुरुषाचे दृष्टीनें याच्या दोन भुजा व तिसरा नेत्र गळून जाईल, त्याच्या हातानें यास मरण येईल. पुढें आई तो पुत्र सर्वांस दाखवित असतां, श्रीकृष्णदर्शन होतांच, दोन भुजा व तिसरा नेत्र गळून पडला. त्यावेळीं आईनें यास मारूं नको अशी श्रीकृष्णाची विनंति केली. कृष्ण ह्मणाला–याचे शंभर अपराध क्षमा करीन, अधिक झाल्यास मोक्षसदन दाख-

वीन. असें बोलतांच, हा शंभर अपराध कशाला करील ! असें आईस वाटून आनंद झाला.

इतकें भीमास सांगून ह्मणाला—याच्या शंभर अपराधाचें गणित होत आहे ह्मणून श्रीकृष्ण वाट पाहात निवांत बसला आहे. शिशुपाळ, वक्रदंत हेच पूर्वीचे रावण कुंभकर्ण होत. हाच जनकपुरास सीता हरण करावयास आला होता. तसाच रुक्मिणी वरावयासही धांवला होता. तो द्वेष धरून कृष्णाची निंदा करित आहे. असें भीष्माचें वचन ऐकतांच, शिशुपाळ क्रोधानें भीष्मास ह्मणाला—अरे नपुंसका ! जो चोर जार, कपटी, जालंदराची पत्नी वृंदा तिशीं रत होणारा, अशाची वाखाणणी करतोस ? नंतर सर्वांस ह्मणाला—या भीष्माचा कुटके करून, किंवा पक्व तेल कढईत घालून प्राण घेऊं या. त्यावर भीष्म ह्मणाला—जो बोललेला बोल सत्य करित नाहीं त्याचे सर्व पूर्वज महानरकांत पडतील. अरे, तुजवर कालमृत्यूची छाया पडल्यामुळें असा तूं जल्पतो आहेस.

हें वचन ऐकतांच, शिशुपाळ जास्त खवळून शस्त्र काढून कृष्णास ह्मणाला—नपुंसका गोरक्षा ! तुला लाज वाटत नाहीं ? तूं रुक्मिणीस चोरून नेलीस ! ती मला देऊं केली होती. तिला मी मनांतच भोगिली, तें माझें उच्छिष्ट तूं भोगित आहेस. असें ऐकतांच, श्रीकृष्ण ह्मणाला—हे निंदका

दुर्जना ! तूं अग्रपूजा इच्छितोसना ? ती आत्तांच घे. असें बोलून श्रीहरीनें सुदर्शनाचें स्मरण करून, शिशुपाळावर सोडलें. तोंच त्याचें शीर आकाशांत उडून, श्रीकृष्णचरणाजवळ येऊन पडलें. त्यावेळीं अंतर्ज्योती श्रीकृष्णशरीरांत येऊन शिरली. अशी तिसऱ्या जन्मांत त्याला अक्षय्य मुक्ति दिली. मग देवांनीं पुष्पवृष्टि केली.

नंतर दुष्टांसह वक्रदंत पळून गेला. कौरवांस चिंता पडली. धर्मराजानें पार्थास शिशुपाळाच्या प्रेतास अग्नि देण्यास सांगितलें. मग त्याच्या पुत्रास राज्य देऊन, धर्मानें सर्वांस वस्त्रालंकार दिले. मग श्रीकृष्णानें धर्मादि सर्वांची आज्ञा घेऊन द्वारकेस गमन केलें.

पुढें वक्रदंत पौंड्रकासह शिववरदविमानांत बसून अफाट सैन्यानिशीं द्वारकेवर चाल करून, वेढा घातला. तोंच श्रीकृष्णानें सुदर्शन सोडून वक्रदंताचें शीर उडविलें व पौंड्रकाचा सैन्यासह संहार केला. असा प्रताप करून श्रीकृष्णानें शस्त्रें ठेविलीं, आणि ह्मणाला—मुख्य शिशुपाळ वक्रदंत वधणें हा आमचा मनोगत पूर्ण होऊन, अवतारकृत्य संपलें. यापुढें आह्मांस शस्त्र धरणें नाहीं. आतां अर्जुनाचें सारथ्य करून, त्याच्या हातून दुष्टांचा वध होईल.

अध्याय ३६ वा.

ग्रहणतीर्थ यात्रेंत सर्वांच्या भेटी, नृगराजाचा उद्धार, मृत बालकांचें संजीवन, पुंडलिक विठ्ठलाचें दर्शन व ग्रंथसमाप्ति.

श्रीकृष्ण द्वारकेंत नांदत असतां, सूर्यग्रहण आलें; तेव्हां कुरुक्षेत्रास जाण्याचा निश्चय केला. त्या पूर्वींच बळरामास गोकुळांत पाठविला होता. तो नंदादि गौळ्यांस भेटून, श्रीकृष्णाचा प्रताप सांगून, तेथें चार महिने राहिला. श्रीकृष्ण मथुरेहून गेल्यावर कोण कोणते दैत्य मारले, अष्टनायिका व सोळा सहस्र कामिनी कशा वरिल्या, राजसूययज्ञ कसा केला, व शिशुपाळास कसा मारिला इत्यादि चरित्रें ऐकतांच, गौळी गौळणी तटस्थ होऊन, तो चक्रपाणी कधीं भेटेल असें बोलूं लागल्या. बलराम नित्य वनांत जाऊन श्रीहरीचीं क्रीडास्थानें पाहात असे.

एके दिवशीं सूर्य माध्यान्हीस आला असतां, बळरामानें जलक्रीडेची इच्छा धरून, यमुना दूर होती तिला जवळ बोलावूं लागला, पण ती आपल्याच छंदानें वाहात होती;

तेव्हां बलरामास क्रोध येऊन त्यानें नागर घालून यमुनेस आपल्या जवळ ओढिली व जलक्रीडा करून गोकुळांत आला. नंतर चार महिने होतांच द्वारकेस गेला, आणि गोकुळांतील सर्व वर्तमान कृष्णास सांगितलें.

पुढें ग्रहणयात्रेकरितां श्रीकृष्ण छप्पन्न कोटी यादवांसह उग्रसेन, बळिभद्र, वसुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, अक्रूर, उद्धव, रुक्मिणीसह अष्ट नायिका, सोळा सहस्र गोपिका, देशो-देशींचे राजे, निजभारांसह कौरव पांडव यांसह कुरुक्षेत्रीं येऊन उतरला व निरनिराळीं शिबिरें उभारलीं. त्यापूर्वी गोकुळांतही दूत पाठविला होता, त्याच्या बरोबर नंदादिक गौळी, गौळणी, गोपाळ आनंदानें निघाले. असंख्य गौ-ळ्यांनीं गोरसाच्या कावडी भरून आणिल्या, गोपाळ पांवे घेऊन आनंदानें नाचूं लागले. मृदंग, टाळ, मोहऱ्या, घुमऱ्या सनई वाजवित हरींची बाललीला गात गोपाळ येत होते, कित्येकांनीं चित्र विचित्र घोंगड्या पांघरल्या होत्या. असे ते सर्व गोकुळवासी येतांच, दूतांनीं कृष्णास जाणविलें.

तेव्हां कृष्ण रुक्मिणीस ह्मणाला—माझीं माता पितरें व बाळमित्र गोकुळाहून आले. असें ऐकतांच अष्टनायिकांसह रुक्मिणी पाहावयास उदित झाल्या. तों लक्षानुलक्ष गाडे करून, गौळी व गोपिका हरिलीला गात येत होत्या; त्यांस

श्रीकृष्ण सामोरा झाला, गोपांनीं लोटांगणें घालतांच, त्यांस प्रेमानें भेटला. तेव्हां गोपाळ ह्मणाले–चक्रपाणी ! तुझी करणी आह्मांस कळली, तूं परम नाटकी चित्तचोर तुझा विश्वास नाहीं. तुला आतां भाग्य आलें ह्मणून बाळमित्रांस विसरलास. तूं आमच्या बरोबर गाई राखित असतां, कान्हा ह्मणून तुला हांका मारित होतों. हमामा, हुमऱ्या, हुतुतु आमच्या बरोबर खेळून आमच्या शिदोऱ्या चोरून खात होतास. तुझ्या गोकुळांतील खोडी शेषाच्यानेंही वर्णन करवणार नाहींत. आतां तुला भाग्य आलें ह्मणून आह्मांस विसरलास. असें गोपाळांचें भाषण ऐकतांच, रुक्मिणी आदिकरून स्त्रिया हांसूं लागल्या.

नंतर गोकुळांतील स्त्रियांनीं कृष्णचरणावर मिठ्या घातल्या व ह्मणाल्या–वनमाळी ! त्वां गोकुळ सोडून द्वारका वसविलीस, पण आह्मांला कधीं भेट दिली नाहींस. मग गोपिकांचें समाधान करून, श्रीहरी गौळ्यांस भेटला. तोंच नंद यशोदेस पाहून चरणावर मिठी घालतांच, यशोदेनें क्षेमालिंगन दिलें; त्यावेळीं यशोदेच्या स्तनास पान्हा फुटला. यशोदा बोलली–सकुमारा ! फार दिवस आह्मांस सोडून गेलास, परंतु तुझी बाललीला आठवून आह्मीं प्राणांचें रक्षण केलें. कृष्ण ह्मणाला–आई ! माझें मन तुजपाशींच आहे. नंतर

नंद कृष्णाची भेट झाल्यावर नंदयशोदेस हातीं धरून, वसुदेव देवकीजवळ आणिलीं; त्यांनीं एकमेकांस क्षेमालिंगनें दिलीं.

त्यानंतर अष्टनायिका व सोळा सहस्र कामिनी यशोदेच्या चरणीं लागल्या. असो. मग कृष्णानें ग्रहणीं स्नान करून यात्रेचें सांग दान करून सर्वांस वस्त्रालंकार दिले. नंद यशोदेचें कृष्णानें पूजन करून धन अलंकार अर्पण केले. कृष्णनायिकांनीं यशोदेस वस्त्रालंकार दिले; श्रीकृष्णाचे पुत्र, नातु यशोदेस भेटले. देवकी यशोदेस म्हणाली– तूं हरीचें बाळपण पाहिलेंस व स्तनपान करविलेंस, तूंच त्रिभुवनांत धन्य होय. कंसानें माझीं सहा बाळें आपटून मारिलीं ! असें बोलतांच, तिला बंदिशाळेंतील दुःखाची आठवण होऊन रुदन आलें. मग कृष्णास म्हणाली–तूं जसा गुरुपुत्र आणून दिलास, तशीं माझीं बाळें आणून मला भेटीव.

असें देवकीचें वचन ऐकतांच, श्रीकृष्ण म्हणाला–माते ! आतांच तुला साही बाळें भेटवितों. असें बोलून यमास आज्ञा करून सहाही बाळें देवकीस आणून दिलीं; असें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. मग श्रीकृष्णानें गोकुळांतील जनांस पंक्तीस घेऊन भोजन करून, तेथें पांच रात्री क्रमून सर्वांस सुख दिलें. नंतर नंदादिक जन आज्ञा घेऊन गोकुळांत गेले,

व श्रीकृष्णही दळभारासह ग्रहणयात्रा संपूर्ण करून द्वारकेस आला.

पुढें एके दिवशीं कृष्णाचे मुलगे यादवांसह चेंडुफळीचा खेळ खेळत अरण्यांत धांवत असतां, चेंडू एका मोठ्या विहिरींत जाऊन पडला. तेव्हां यादव विहिरींत पाहूं लागले तों तींत पाणी नसून, एक पर्वतासारखा भयंकर सरडा दृष्टीस पडला. त्यास पाहतांच, यादव ह्मणाले—एवढा सरडा आह्मीं आजपर्यंत पाहिला नव्हता. मग त्यांनीं कृष्णास सांगतांच, तो विहिरींत पाहूं लागला. कृष्णाची दृष्टी सरड्यावर पडतांच, त्याचा उद्धार होऊन दिव्य शरीर पावून कूपाबाहेर आला व श्रीकृष्णाचे चरणीं मस्तक ठेविलें. त्याला श्रीकृष्णानें तूं कोण ह्मणून विचारतांच तो ह्मणाला—माझें नांव नृगराजा, मी पुण्यपंथानें वर्त्तत असतां, मजकडून एक अपाय घडला; तो असा कीं, एका महापर्वकाळी ब्राह्मणांस बोलावून सवत्स सहस्र गाईचें दान केलें. त्यांतील एका ऋषीची गाय पळून आमच्या कळपांत आली. ती मी न जाणून दुसरे दिवशीं दुसऱ्या एका ब्राह्मणास दान दिली. ती पहिल्या ब्राह्मणानें धरून नेतांच, दुसरा त्यास ह्मणाला—ही आतांच मला दान दिली ती मी देणार नाहीं. असें त्या दोघांचें भांडण जुंपतांच मी दोघांचे चरण धरिले व पहिल्या

ब्राह्मणास हजार गाई द्यावयास सिद्ध झालों; परंतु तो घेईना, तो माझीच मला दे असें बोलूं लागला. दुसऱ्याची प्रार्थना केली परंतु तोही ऐकेना.

मग त्या दोघांनीं मला शाप दिला कीं, तूं सरडा होऊन कूपांत पडशील. त्यांची मी प्रार्थना करितांच उःशाप दिला कीं, " पुढें श्रीकृष्ण अवतरेल, त्याची दृष्टी पडतांच स्वर्गास उद्धरून जाशील." असें ऐकतांच, श्रीकृष्ण यादवांस ह्मणाला-पहा ! किंचित् अन्यायानें केवढा अनर्थ झाला ! यास्तव तुह्मींही ब्राह्मणांस भिऊन सावध असा. असो. त्या राजास तात्काळ विमान येऊन तो इंद्रभुवनीं निघून गेला.

नंतर श्रीकृष्ण द्वारकेंत आल्यावर अर्जुन भेटीस आला. त्यांनीं एकमेकांस आलिंगन दिलें. त्या दोघांचें भोजन, आसन, शयन, गुह्य गोष्टी बोलणें इ० एकांतांत होत असे. तों द्वारकेंतील एका ब्राह्मणाचीं आठ मुलें सटून, नवव्यानें स्त्री प्रसूत होऊन पुत्र झाला होता. त्या ब्राह्मणानें श्रीरंगाजवळ येऊन बाळांचा वृत्तांत सांगितला आणि ह्मणाला-पांचवे दिवशीं मुलें मरतात त्याला काय उपाय करावा तें सांगावें. तेव्हां पार्थ मर्वानें ह्मणाला—मी तुझ्या बाळाचें रक्षण करीन. मी सामर्थ्यवंत असतां यमदूत काय करतील ? जर बाळाचा

प्राण जाईल तर मी अग्निकाष्ठें भक्षीन. असा पण करून ब्राह्मणाच्या घरावरून बाणांचें मंदिर रचून, दिव्य मंत्र जपून धनुष्यास बाण लावून, दारांत रक्षण करित बसला.

पांचवा दिवस येतांच, बालकाचा प्राण गेला. त्याबरोबर माता वक्षस्थळ बडवून शोक करूं लागली. तेव्हां अर्जुनास क्रोध चढून, तो यमपुरास गेला आणि यमास विचारूं लागला. मग पार्थानें स्वर्ग, मृत्यु, पाताळ, चौदा लोक शोधले तरी बाळें सांपडलीं नाहींत. त्यामुळें पार्थ निराश होऊन द्वारकेंत येऊन अग्नि पेटवून प्राण द्यावयास सिद्ध झाला.

तो वृत्तांत कृष्णास कळतांच, पार्थाजवळ आला. त्यानें कृष्णास सर्व वृत्त कथन केलें. मग श्रीहरीनें दिव्यरथ सजवून अर्जुनास बरोबर घेऊन, सप्त समुद्र क्रमून, सात आवरणें भेदून आदिनारायणाजवळ अर्जुनास उभें केलें. त्या आदिनारायणाच्या स्वरूपतेजांत श्रीकृष्ण मिळून गेला. त्याबरोबर अर्जुन घाबरा झाला; त्याला त्या अद्भुत तेजाकडे पाहवेना. मग तो नेत्र झांकून, श्रीकृष्ण नांवानें हांका मारूं लागला. तेव्हां कासाविस झालेल्या त्या पार्थास श्रीकृष्णानें दिव्यचक्षु देऊन, आपलें तेज पाहण्यास सांगितलें. अर्जुन पाहूं लागला तों ब्राह्मणाचीं नवही बाळें खेळत असलेलीं

पाहिलीं. मग आदिनारायणाची स्तुति करून, नवही बाळें मागून घेऊन, ते दोघे रथांत बसून द्वारकेंत आले. कृष्णानें तीं बाळें अर्जुनाजवळ दिलीं व ब्राह्मणास स्त्रीसह बोलावून आणून, त्यांची पूजा करून तीं बाळकें त्यांच्या स्वाधीन केलीं. तेव्हां ब्राह्मण आनंदित होत्साता, अर्जुनाचें यश वर्णित घरीं गेला.

मग अर्जुन श्रीहरीस ह्मणाला—हृषिकेशी ! तुह्मी लीला ब्रह्मादिक, इंद्र यांसही अनम्य होय. कृष्ण बोलला—पार्था ! सर्व स्वरूपें मीच धरित असून, कर्ता हर्ता पाळिता मीच होय. असो. अर्जुन आज्ञा घेऊन इंद्रप्रस्थास जाऊन, गर्वरहित होत्साता, श्रीकृष्णस्मरण करित राहिला.

श्रीधर श्रोतयांस ह्मणाला—आतां पद्मपुराणांतील शची विष्णुभुवनास गेली. तेथें वैकुंठराणा लक्ष्मीसहित पाहतांच, हरीच्या अर्धांगीं बसावें अशी तिच्या मनाची इच्छा झाली. तीं जाणून हरी ह्मणाला—तूं साठ हजार वर्षे हिमालय पर्वतावर तप कर. पुढें मी कृष्णावतार धरून, गोकुळांत लीलाचरित्रें दाखवीन तेव्हां तूं राधा होऊन, गोकुळांत प्रगट हो. तेथें मी तुला वरीन. मग मी कंसवधास जाईन त्यावेळीं तूं गुप्त होऊन, द्वारकेस ये. असा वर मिळतांच

इंद्राणीनें तप करून गोकुळांत प्रगट होऊन, मुरारी कुंजवनांत भोगिला.

नंतर श्रीकृष्ण मथुरेस जातांच, राधेला वियोग सहन न होऊन, ती पुनः हिमाचलावर तप करण्यास गेली. ताच द्वारकेस येतांच, श्रीकृष्णानें तिला आलिंगन देऊन अंकावर बसविली. त्यामुळें अद्यापि द्वारकेस राधा कृष्णाचें पूजन होतें तें सर्व लोक पाहात आहेत. असो. श्रीकृष्ण राधेला अंकावर घेऊन बसला असतां, तेथं रुक्मिणी आली. श्रीकृष्णाच्या सत्यभामादि इतर स्त्रिया रुक्मिणीसमोर श्रीहरीच्या अंकावर बसत नसत. तरी रुक्मिणी येतांच राधा उठली नाहीं, त्यामुळें रुक्मिणीस राग येऊन व पुढील भविष्यार्थ जाणून, ती दक्षिण दिंडीरवनांत येऊन तपास बसली. दिंडीरवन तीच पंढरी भीमातीरीं आहे. तेथें भीमककन्या तप करूं लागली.

इकडे द्वारकेंतून रुक्मिणी जातांच, सर्व नगर कळाहीन झालें. मग श्रीकृष्ण रुक्मिणीकरितां सर्व उर्वीमंडळ शोधित गोकुळांत आला व बाळवेष धरून, गाई गोपाळ बरोबर घेऊन, दक्षिण दिशेस ज्याला लोहदंडक्षेत्र अथवा दिंडीरवन म्हणतात, तेथील उपवनांत, गाई गोपाळांस मागें टाकून प्रवेश केला. तों रुक्मिणी तप करित बसलेली दृष्टीस पडली.

तिला श्रीकृष्ण ह्मणाला—हे पद्मनेत्रे ! तूं येथें येऊन कां बसलीस ? मला तुजवांचून गमत नाहीं ह्मणून धांवत आलों. रुक्मिणी बोलली—तूं कोण आहेस तें मला सांग. चोरट्यासारखा अकस्मात् येऊन, परस्त्रीशीं बोलण्याचें तुला कारण काय ? तूं परनारीस प्रिया ह्मणतोस, यावरून मला वाटतें कीं, तूं बाळपणापासून परद्वारी आहेस.

असें भीमकीचें वचन ऐकतांच, श्रीकृष्णानें हास्य करून, दृढालिंगन देऊन, तिचें समाधान केलें. तों पुढें पुंडलिक भक्त मातापित्याची सेवा करित होता, ती पाहून संतोषित होऊन त्याच्या समोर जाऊन उभा राहिला आणि ह्मणाला-धन्य धन्य रे पुंडलिका ! वर माग. तों[illegible] श्रीकृष्णास बसावयास वीट फेंकली. [illegible] व कमरेवर हात ठेवून, भक्तास[illegible] बापांची सेवा पूर्ण [illegible] ला[illegible] ब[illegible]

विठ्ठल नांव चालावें. नंतर द्वारकेची संपदा श्रीकृष्णानें पंढरीस आणून भरिली. तेव्हांपासून पंढरीचा महिमा वाढून विठ्ठल रखुमाई विटेवर उभीं राहून भाविक भक्तजनांस दर्शन देत आहेत. त्या पांडुरंगाच्या वरदेंकरून, हा ग्रंथ पंढरीस निर्माण झाला. याचें एकदां श्रवण केल्यानें दारुण पापें भस्म होतात. तीन पारायणें केलीं असतां कुळांत भक्तराज दिव्यपुत्र होईल. यास्तव भावार्थानें श्रवण पठण करून, आपल्या जन्माची सार्थकता करून घ्यावी, अशी वाचकांस श्रीधर कवीची सविनय प्रार्थना आहे.